प्रेस नोट                    दि.१५/०३/२०२१

---

आज दिनांक १५/०३/२०२१ रोजी सकाळी ११.१५ वा. नवघर गावामध्ये राहणारी महिला हिची २ महिन्यांची मुलगी एका अज्ञात महिला आरोपीने मुलीला डोस देण्याचे बहाण्याने पळवून नेल्याबाबत उरण पोलीस ठाण्यात गुन्हा रजि नं ७४/२०२१ भादवि ३६३ प्रमाणे दाखल करण्यात आला होता. सदर गुन्हयांचे गांभिर्य ओळखून उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री रविंद्र बुधवंत यांनी सदरची माहिती तात्काळ वरिष्ठांना देवून श्री शिवराज पाटील, पोलीस उपआयुकत सो, पनवेल व श्री सचिन सावंत, सहा पोलीस आयुक्त, पोर्ट विभाग यांचे मार्गदशानाखाली पुढील तपास सुरू केला. गुन्हयाचे घटनास्थळी जावून गुन्हयाची हकीकत समजावून घेवून नवघर गावातील सिसीटीव्ही फुटेज तसेच गोपनिय माहितीगार यांचेकडून माहिती प्राप्त करून सीसीटीव्हीमध्ये दिसून आलेल्या रिक्षाचा शोध पोलीसांच्या ३ पथकांच्या वतीने करण्यात येत होता. द्रोणागिरी परिसरात रिक्षाचा शोध घेत असताना सपोनि होनमाने, पोना/१७४४ शशिकांत घरत, पोना/३१६६ रोहीत राठोड, पोशि/१२४०४ प्रमोद कोकाटे यांना सदर वर्णनाची रिक्षा दिसून आली. त्यावेळी सदर रिक्षा चालकाकडे चौकशी केली असता त्याने नवघर गावातून एक महिला व लहान मुल यांना दास्तान फाटा येथे सोडल्याची माहिती रिक्षाचालकाने दिली. त्यानंतर पोलीसांच्या वतीने दास्तान फाटा येथील रिक्षा स्टॅन्ड येथे जावून माहिती घेतली असता सदरची आरोपी महिला ही रिक्षातुन गुणे हॉस्पिटल, पनवेल येथे गेल्याची माहिती रिक्षा चालकाकडून प्राप्त झाली. त्यावेळी तात्काळ गुणे हॉस्पिटल येथे जावून सीसीटीव्ही फुटेजची पाहणी केली असता आरोपी महिला लहान मुलासह सीसीटीव्ही फुटेज मध्ये दिसून आली. त्यानंतर पनवेल भाजीमंडई येथील रिक्षा स्टॉप येथील रिक्षाचालकांकडे पोलीस पथकाच्या वतीने आरोपी महिला व लहान मुलाची विचारपूस केली असता एका रिक्षा चालकाने सदर महिलेला खांदा कॉलनी येथील कृष्णा हॉस्पिटल येथे सोडल्याची माहिती मिळून आल्याने पोलीस पथकाच्या वतीने तात्काळ कृष्णा हॉस्पिटल येथे जावून पाहणी केली असता आरोपी महिला व लहान मुल दोघेही सदर ठिकाणी आढळून आले. त्यावेळी पोलीसांच्या वतीने आरोपी महिला हिस ताब्यात घेवून लहान मुलीस सुरक्षित तिच्या आईवडीलांच्या ताब्यात दिलेले आहे.

सदर गुन्हयाची तपास श्री शिवराज पाटील, पोलीस उपआयुकत सो, पनवेल व श्री सचिन सावंत, सहा पोलीस आयुक्त, पोर्ट विभाग यांचे निरीक्षणाखाली श्री रविंद्र बुधवंत, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री तुकाराम निंबाळकर, सहा पोलीस निरीक्षक, श्री शिवाजी होनमाने, सहा पोलीस निरीक्षक, श्री राजू पठाण, सहा पोलीस निरीक्षक, पोहवा/२९ भाट, पोना/१७४४ शशिकांत घरत, पोना/३१६६ रोहीत राठोड, पोना/६०८ हरिदास गिते, पोना/२३५१ संजय कुथे, पोना/२८७१ सचिन केकरे, पोना/३१६५ अमोल राठोड, पोशि/३०४८ सचिन माळशिखारे, पोशि/१२४०४ प्रमोद कोकाटे, मपोना/अमिता पाटील, मपोना/प्रिती म्हात्रे यांनी तपास केला. तसेच वरिष्ठांच्या आदेशाने समांतर तपास पनवेल शहर पोलीस ठाण्याचे श्री अजय लांडगे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक व गुन्हे प्रकटीकरण पथक, न्हावाशेवा व तळोजा पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटीकरण कक्षाचे अधिकारी व अंमलदार यांनी सुध्दा केलेला आहे. सदर गुन्हयातील आरोपी महिला व लहान मुल यांना ५ तासात ताब्यात घेवून उल्लेखनिय कामगिरी केलेली आहे.